International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# महाराष्ट्रातील मानवतावादी दृष्टीकोन आणि नवीन नेतृत्व : एक चिकित्सक अभ्यास

**श्री. राजेश राम कांडगे**

*संशोधक*

*Corresponding Author –* श्री. राजेश राम कांडगे

**DOI - 10.5281/zenodo.18655436**

***सारांश (Abstract):***

*हा शोध निबंध महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रातील बदलत्या नेतृत्वाच्या स्वरूपाचा 'मानवतावादी' (Humanities) दृष्टीकोनातून चिकित्सक अभ्यास करतो. महाराष्ट्र हे नेहमीच वैचारिक क्रांतीचे केंद्र राहिले असून छत्रपती शिवाजी महाराजांचे लोककल्याणकारी राज्य, महात्मा फुलेंची सत्यशोधक चळवळ, राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक न्यायाचे धोरण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा घटनात्मक मानवतावाद यातुन महाराष्ट्रातील नेतृत्वाची जडणघडण झालेली आहे. मात्र, २१ व्या शतकातील जागतिकीकरण आणि डिजिटल क्रांतीमुळे नेतृत्वात तांत्रिक कार्यक्षमता वाढली असली, तरी मानवी संवेदना आणि नैतिक मूल्यांचा -हास होताना दिसत आहे. या संशोधनासाठी गुणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून दुय्यम माहिती स्त्रोतांच्या आधारे ऐतिहासिक व समकालीन नेतृत्वशैलीचे विश्लेषण केले आहे. या संशोधनातून असे दिसून येते की, केवळ आकडेवारीवर आधारित भौतिक विकास म्हणजे खरी प्रगती नसून, मानवी प्रतिष्ठा व मानवी मूल्ये यांची जोपासना करण्यासाठी नेतृत्वामध्ये 'सांस्कृतिक साक्षरता' आणि 'भावनिक बुद्धिमत्ता' असणे अनिवार्य आहे. हा शोध निबंध नवीन पिढीतील नेत्यांसाठी एक असा वैचारिक आराखडा सादर करतो, जो तांत्रिक प्रगती आणि शाश्वत मानवी मूल्ये यांचा योग्य समन्वय साधतो. निष्कर्षात असे सुचवले आहे की, भविष्यातील नेतृत्व हे केवळ सत्ताकेंद्रित नसावे, तर ते महाराष्ट्राच्या मानवतावादी वारशाचे पाईक आणि घटनात्मक नैतिकतेचे रक्षक असावे, तरच लोकशाही मूल्ये अधिक बळकट होतील.*

**प्रस्तावना (Introduction) :**

महाराष्ट्र ही केवळ एक भौगोलिक सीमा नाही, तर ती संतांची, विचारवंतांची आणि ध्येयवादी नेत्यांची एक अखंड व प्रवाही अशी वैचारिक भूमी आहे. भारतीय संघराज्यात महाराष्ट्राचे स्थान केवळ आर्थिक किंवा भौगोलिक दृष्ट्या महत्वाचे नाही, तर वैचारिक दृष्ट्याही हे राज्य देशाला दिशा देणारे ठरले आहे. "महाराष्ट्र धर्म" ही संकल्पना केवळ एका प्रदेशापुरती मर्यादित नसून, ती 'मानवता', 'सहिष्णुता' आणि 'न्यायावर' आधारित एक जीवनपद्धती आहे. मानवतावाद (Humanities) हा शब्द व्यापक अर्थाने मानवी अनुभव, मूल्ये, नैतिकता आणि संस्कृतीच्या अभ्यासाशी संबंधित आहे. इतिहास आपल्याला भूतकाळातील धडे शिकवतो, साहित्य आपल्याला दुस-याच्या वेदनेची जाणीव करून देऊन आपल्या संवेदना जागृत ठेवते, तर तत्वज्ञान आपल्याला सत्तेच्या आणि जीवनाचा उच्च उद्देशाची जाणीव करून देते. जेव्हा आपण या मानवतावादी विषयांचा संबंध 'नवीन नेतृत्वाशी' जोडतो, तेव्हा एक मोठा वैचारिक विरोधाभास आजच्या समाजात स्पष्टपणे दिसून येतो.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत महाराष्ट्रातील नेतृत्व हे साहित्याशी, संस्कृतीशी आणि सामान्य माणसाच्या जगण्याशी नाळ जोडलेले होते. मात्र २१ व्या शतकातील जागतिकीकरण, भांडवलशाहीचा प्रभाव आणि तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर यामुळे नेतृत्वाच्या स्वरुपात आमुलाग्र बदल झाले आहेत. आजचे नेतृत्व हे पूर्वीपेक्षा अधिक शिक्षित, तंत्रज्ञानप्रेमी आणि व्यावसायिक असले, तरी त्यांच्यामध्ये 'मानवी स्पर्श' (Human Touch) आणि 'नैतिक गांभीर्य' कमी होत असल्याचे जाणवते (देशपांडे,२०१४). राजकीय अस्थिरता, वाढते सामाजिक ध्रुवीकरण आणि संवादहिनता या पार्श्वभूमीवर, मानवतावादी दृष्टीकोन असलेल्या नेतृत्वाची गरज आज पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने अधिक प्रकर्षाने जाणवते. या शोध निबंधाचा मुख्य उद्देश आधुनिक नेतृत्वाच्या तांत्रिक कार्यक्षमतेची तुलना पारंपारिक मानवातावादी मूल्यांशी करणे आणि भविष्यातील नेतृत्वाचा एक सर्वसमावेशक आराखडा मांडणे हा आहे.

**साहित्य पुनरावलोकन (Literature Review):**

कोणत्याही संशोधनाचा पाया हा त्या विषयावर आधी झालेल्या अभ्यासावर अवलंबून असतो. महाराष्ट्रातील नेतृत्वावर सिरसीकर व्ही. एम. (१९९५) यांनी आपल्या 'Politics of Modern Maharashtra' या ग्रंथात नेतृत्वाच्या सामाजिक रचनेचा सखोल ऊहापोह केला आहे. त्यांच्या मते, महाराष्ट्रातील नेतृत्व हे नेहमीच मध्यम आणि ग्रामीण स्तरावरून उदयाला आले असून त्याला 'सहकार' चळवळीचा मोठा आधार राहिला आहे. पळशीकर सुहास (२००४) यांनी आधुनिक राजकारणातील 'जातीय अस्मिता' आणि 'विकासाचे राजकारण' यांच्यातील संघर्षावर महत्वाचे भाष्य केले आहे. त्यांच्या मते, जेव्हा नेतृत्व केवळ आकड्यांच्या खेळावर लक्ष केंद्रित करते, तेव्हा समाजातील मानवी घटक दुर्लक्षित होतात.

जागतिक स्तरावर, Nussbaum Martha (२०१०) यांनी 'Not for Profit' या पुस्तकात असा इशारा दिला आहे की, जर शिक्षण व्यवस्थेतून आणि सार्वजनिक जीवनातून मानव्यविद्या (Humanities) पूर्णत: बाजूला केल्या, तर आपण अशा नेत्यांची पिढी तयार करू जे केवळ यंत्रासारखे काम करतील आणि ज्यांच्याकडे सामाजिक प्रश्नांवर विचार करण्यासाठी लागणारी तळमळ नसेल. महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी, विशेषत: साने गुरुजींनी आपल्या साहित्यातून नेत्याला 'भावनेची' आणि 'नैतिकतेची' जोड देण्याचे आवाहन केले आहे. देशपांडे राजेश्वरी (२०१४) यांनी आधुनिक मध्यमवर्गीयांच्या आकांक्षा आणि बदललेले राजकीय नेतृत्व यांचा समाजशास्त्रीय संबंध स्पष्ट केला असून, नेतृत्वाचा सांस्कृतिक पाया कसा ढासळत चालला आहे, यावर प्रकाश टाकला आहे.

**संशोधन पद्धती (Research Methodology):**

या संशोधनात विषयाचे गांभीर्य आणि व्याप्ती लक्षात घेऊन या संशोधनासाठी 'वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक' (Descriptive and Analytical) पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**१. माहितीचे संकलन (Data Collection):** हे संशोधन प्रामुख्याने दुय्यम स्त्रोतांवर आधारित आहे. यात राजकीय विचारवंतांचे ग्रंथ, समाजसुधारकांचे चरित्रग्रंथ, विधानसभेतील भाषणे आणि ऐतिहासिक दस्तऐवजांचा संदर्भ घेतला आहे.

**२. ऐतिहासिक तुलना:** छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वशैलीचा अभ्यास

करून त्यांची तुलना आधुनिक 'कॉर्पोरेट' नेतृत्व शैलीशी केली आहे.

**३. गृहितके (Hypothesis):**

- मानवतावादी मूल्यांची जाणीव असलेल्या नेत्याची जनमानसावरील पकड आणि नैतिक अधिकार अधिक काळ टिकतो.
- आधुनिक नेतृत्वात तांत्रिक कार्यक्षमता जास्त जरी असली, तरी 'भावनिक बुद्धिमत्ता' (Emotional Intelligence) कमालीची कमी आहे.

**विषयाचे सविस्तर विवेचन (Detailed Analysis) :**

**१. महाराष्ट्रातील नेतृत्वाचा ऐतिहासिक मानवतावादी वारसा:**

महाराष्ट्रातील नेतृत्वाची जडणघडण ही केवळ सत्ताप्राप्तीसाठी नसून ती मानवी प्रतिष्ठा पुनर्स्थापित करण्यासाठी तसेच मानवी मूल्यांची जोपासना व संवर्धन करण्यासाठी झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी जेव्हा 'रयतेचे राज्य' स्थापन केले, तेव्हा त्यांनी तत्कालीन सरंजामशाही मोडून काढली. स्वराज्य उभे करताना केवळ जमिनीचे तुकडे किंवा गड जिंकले नाहीत, तर माणसांची मने जिंकली. त्यांच्या 'आज्ञापत्रा' मध्ये रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका, असे जे आदेश आहेत, तेच ख-या अर्थाने मानवतावाद आहे (Phadke, 1991). महाराजांच्या मानवतावादाचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे त्यांनी स्त्रियांना दिलेला सन्मान आणि दुष्काळात शेतक-यांना दिलेली कर्जमाफी. ही मूल्ये आजही आधुनिक नेतृत्वासाठी दिशादर्शक आहेत.

त्यानंतर १९ व्या शतकात महात्मा फुले यांनी जेव्हा शिक्षणाचे महत्व सांगितले, तेव्हा त्यांचा हेतू केवळ साक्षरता नव्हता, तर मानवी बुद्धीला गुलामगिरीतून मुक्त करणे हा होता. 'शेतक-याचा आसूड' मधून शोषितांचा आणि उपेक्षितांचा आवाज त्यांनी मांडला. त्यांच्या सत्यशोधक विचारांनी नेतृत्वाला सामाजिक जबाबदारीची जाणीव करून दिली. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात १९०२ मध्ये आरक्षणाची घोषणा केली. त्यांचा हा निर्णय उपेक्षितांच्या मानवी हक्कांचा जाहिरनामा होता. प्रशासनात आरक्षणाची अंमलबजावणी करून 'सामाजिक न्याय' केवळ भाषणांत न ठेवता त्यांनी तो प्रत्यक्ष आचरणात आणला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जेव्हा महाडचा सत्याग्रह केला, तेव्हा त्यांनी पाण्याचा प्रश्न केवळ तहान भागवण्यासाठी नव्हे, तर मानवी समतेसाठी हाताळला. भारतीय संविधानाद्वारे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही वैश्विक मानवतावादी मूल्ये त्यांनी महाराष्ट्राच्या मातीत खोलवर रुजवली (Zelliot, 2005). हा ऐतिहासिक वारसा महाराष्ट्राच्या नेतृत्वाला 'नैतिक अधिष्ठान' प्राप्त करून देतो.

**२. यशवंतराव चव्हाण आणि सुसंस्कृतपणाचा वारसा:**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी राजकारणात 'संस्कृती' आणि 'साहित्याला' सर्वोच्च स्थान दिले. "सत्तेपेक्षा सत्य मोठे आहे आणि सत्तेच्या खुर्चीपेक्षा ज्ञानाची खुर्ची अधिक महत्वाची आहे", असा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला. त्यांच्या नेतृत्वात सत्तेचा अहंकार कधीही आडवा आला नाही, कारण त्यांचा पाया हा मानवातावादी साहित्यावर आधारित होता (चव्हाण, २०१५).

**३. नवीन नेतृत्वाचा उदय आणि आधुनिक आव्हाने:**

१९९० नंतरच्या जागतिकीकरण आणि डिजिटल क्रांतीच्या काळानंतर महाराष्ट्रात नवीन नेतृत्व उदयाला आले. हे नेतृत्व 'स्मार्ट' आहे, डेटा सायन्सशी परिचित आहे, परंतु त्यामध्ये काही गंभीर दोष ही आहेत :

- **इव्हेन्ट मॅनेजमेंट विरुद्ध मूळ प्रश्न** – सध्याचे नेतृत्व सखोल काम करण्यापेक्षा इव्हेन्ट मॅनेजमेंट आणि पीआर (PR) वर अधिक खर्च करते.
- **आकडेवारी विरुद्ध संवेदना** – सरकारकडे असलेले गरिबीचे आकडे कमी झाले असतील, पण शेतक-यांच्या डोळ्यातील पाणी आकडेवारीतून टिपता येत नाही (देशमुख, २०२०).
- **संवादहिनता** – सोशल मीडियामुळे नागरिक आणि नेत्यांमधील थेट संवाद संपून तो 'आयटी सेल' च्या माध्यमातून होऊ लागला आहे.

**४. डिजिटल युग आणि नेतृत्वाचा भावनिक -हास:**

सोशल मीडियामुळे नेतृत्व आता केवळ 'प्रतिक्रियात्मक' (Reactive) झाले आहे. एखादा विषय ट्रेंड झाला की त्यावर प्रतिक्रिया देणे, इतपतच राजकारण मर्यादित झाले आहे. आजचे नेतृत्व सोशल मीडियाच्या 'लाईक्स' आणि 'शेअर्स' वरून आपली लोकप्रियता मोजते. परंतु, डिजिटल व्यासपीठावरील संवाद हा अनेकदा कृत्रिम असतो. एखाद्या संकटाचे वेळी नेत्याने प्रत्यक्ष जमिनीवर उपस्थित राहणे आणि पिडितांशी संवाद साधणे, यातून जी 'भावनिक बुद्धिमत्ता' (EQ) दिसून येते, ती डिजिटल पोस्ट मधून कधीही साध्य होऊ शकत नाही. नवीन पिढीच्या नेत्यांमध्ये ही भावनिक पोकळी वाढत चालली आहे, ज्यामुळे जनतेचा नेत्यांवरील विश्वास कमी होताना दिसत आहे. मानवतावादी विचारांसाठी लागणारा संयम आणि सखोलता या डिजिटल युगात हरवत चालली आहे.

**५. केस स्टडी : ग्रामीण विकास आणि शाश्वत नेतृत्व:**

मानवतावादी नेतृत्वाचा एक महत्वाचा पैलू म्हणजे ग्रामीण महाराष्ट्रातील 'सहकार' आणि 'पंचायत राज' मॉडेल. यशवंतराव चव्हाण यांनी पंचायत राजच्या माध्यमातून सत्तेचे विकेंद्रीकरण केले, जेणेकरून सत्तेचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचेल. मात्र, आधुनिक काळात या संस्थाचे रुपांतर केवळ राजकीय सत्ताकेंद्रात झाले असून, त्यातील 'सहकार' हा मानवी भावनेचा भाग लोप पावत चालला आहे. नवीन नेतृत्वाला जर यशस्वी व्हायचे असेल, तर त्यांना केवळ तांत्रिक विकासावर अवलंबून न राहता ग्रामीण अर्थव्यवस्थेतील मानवी घटकांचा विचार करावा लागेल आणि यातूनच केवळ तांत्रिक विकासच नव्हे, तर सर्वांगीण व शाश्वत विकास साधला जाईल.

**विश्लेषण आणि चर्चा (Discussion):**

या संशोधनात असे दिसून येते की, आधुनिक महाराष्ट्रात नेतृत्वाच्या सर्वांगीण प्रशिक्षणाची मोठी कमतरता आहे. मानवतावाद हा नेत्याला केवळ सत्तेचा उपभोग घेणारा नव्हे, तर समाजाचा 'विश्वस्त' (Trustee) बनायला शिकवतो. सध्याच्या वाढत्या जातीय आणि धार्मिक तणावाच्या काळात, जो नेता मानवतावादी आहे, तोच समाजाला तुटण्यापासून वाचवू शकतो. नेतृत्वात 'सांस्कृतिक साक्षरता' नसल्यामुळे समाजात संवाद संपून द्वेष वाढत चालला आहे. या संशोधनातून असे दिसून येते की, महाराष्ट्रातील नेतृत्व सध्या एका 'वैचारिक संभ्रमात' आहे. एकीकडे जागतिक दर्जाचा विकास साधायचा आहे, तर दुसरीकडे स्थानिक सामाजिक प्रश्नांची गुंतागुंत आहे. 'मानवतावाद' या दोन्हीं टोकांमध्ये सुवर्णमध्य साधण्याचे काम करतो.

**१. चर्चेचे प्रमुख मुद्दे:**

- **प्रशासकीय कार्यक्षमता आणि मानवी संवेदनशीलता** – नेता केवळ फाईली निकाली काढणारा नसावा, तर त्या फाईलीमागे असणा-या गरिबाच्या चेह-याची जाणीव त्याला असावी.

- **सांस्कृतिक साक्षरतेचा अभाव** – साहित्याचा अभ्यास न केल्यामुळे आजच्या नेत्यांच्या भाषणांमधील वैचारिक खोली कमी होऊन केवळ आक्रमकता उरली आहे.
- **नैतिकता आणि राजकारण** – सत्तेसाठी केलेल्या तडजोडींमुळे नेतृत्वाची नैतिक प्रतिमा डागाळली आहे, जी पुन्हा मानवतावादी मूल्यांच्या आधारेच सावरता येईल.

**निष्कर्ष (Conclusion) :**

महाराष्ट्राची प्रगती ही केवळ महानगरांच्या चकाकीवर मोजली जाऊ नये, तर ती राज्यातील शेवटच्या माणसाच्या आत्मसन्मानावरून मोजली पाहिजे. 'नवीन नेतृत्व' हे तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक वेगवान झाले आहे, परंतु त्याला दिशा देण्यासाठी 'मानवतावादी' होकायंत्राची गरज आहे. जर नेतृत्वाने फुले-शाहू-आंबेडकर आणि यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा आधार घेतला, तरच महाराष्ट्र २१ व्या शतकातील आव्हानांना समर्थपणे सामोरे जाऊ शकेल. तंत्रज्ञान हे केवळ 'हात' बनू शकते, पण समाज घडवण्यासाठी लागणारे 'हृदय' हे मानवतावादातच आहे. 'मानवतावाद' हा नेतृत्वाचा आत्मा आहे आणि तोच महाराष्ट्राला उज्वल भविष्याकडे नेऊ शकतो (तावरे, २०१८).

**शिफारशी (Recommendations) :**

- **नेतृत्व प्रशिक्षण** – राजकीय पक्षांनी आपल्या युवा नेत्यांसाठी मानव्यविद्या, इतिहास आणि नीतिशास्त्रावर आधारित कार्यशाळा आयोजित कराव्यात.
- **सांस्कृतिक साक्षरता** – नेत्यांनी केवळ राजकीय व्यासपीठांवर न रमता साहित्य आणि कलेच्या माध्यमातून समाजाची मानसिकता ओळखावी.
- **नैतिक मूल्यमापन** – राजकीय पक्षांनी उमेदवारांचे मूल्यमापन केवळ निवडणुकीच्या यशावर न करता, त्याच्या मानवतावादी कार्यावर करावे.
- **डिजिटल मानवतावाद** – सोशल मीडिया वापर द्वेष पसरवण्यासाठी न करता, मानवी हक्क आणि विकासात्मक मुद्द्यांसाठी करावा. व करताना तो विवेकावर आधारित असावा.
- **लोकशाही संवाद** – सत्तेत असताना आणि नसतानाही विरोधी विचारांचा आदर करण्याची मानवतावादी युती जोपासावी.

**संदर्भ सूची (References):**


1. चव्हाण य. ब. (२०१५), 'कृष्णाकाठ', कॉन्टीनेंटल प्रकाशन.
2. देशमुख स. (२०२०), 'महाराष्ट्रातील राजकीय समाजशास्त्र', डायमंड पब्लिकेशन्स.
3. तावरे श. (२०१८), 'महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास', मेहता पब्लिशिंग हाऊस.
4. Deshpande R. (2014), 'Politics in Maharashtra : Local contexts and global aspirations', Sage Publications.
5. Phadke Y. D. (1991), 'Social Reformers of Maharashtra', Maharashtra Information Centre.

6. Palshikar S. (2004), 'Issues before Maharashtra : Castes, classes and regional imbalances', Pratima Prakashan
7. Nussbaum M. C. (2010), 'Not for Profit : Why democracy needs the humanities', PrincetonUniversity Press.
8. Sirsikar V. M. (1995), 'Politics of Modern Maharashtra', Orient Longman.
9. Zelliot E. (2005), 'From Untouchables to Dalit Essays on the Ambedkar Movement', Manohar Publishers.